महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय पुणे (गृहशाखा)**

एविंग, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, ससुन हॉस्पीटल समोर, पुणे- ४११ ००१

ईमेल.homebranchpune@gmail.com

वाचले:-

१) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी त्यांचेकडील क्र. जि.वा. शाखा/पुणे ग्रामीण/वाहतुक वळविणेबाबत/१३/२०२६ दि.१३/०१/२०२६ रोजीचे पत्र.

२) मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ मधील तरतूद.

३) शासन गृह विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.एम.व्ही.ए.०५८९/सीआर-१०६०/टीआर-२, दि.१९/०५/१९९०.

---

क्र.कायक/कावि/ १५ /२०२६ **दिनांक - १६/०१/२०२६.**

**विषय :- "पुणे ग्रँड चॅलेंज टूर२०२६" सायकल स्पर्धा स्टेज १ अंतर्गत रस्त्यांवरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत.**

अधिसूचना

**ज्याअर्थी,** वाचले क्र.१ अन्वये पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी पुणे ग्रँड चॅलेज टूर २०२६ चे अनुषंगाने वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत विनंती केली आहे. पुणे जिल्हा प्रशासन यांच्या विद्यमाने व सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने **"पुणे ग्रँड चॅलेंज टूर२०२६"** हि सायकल स्पर्धा दि.२० जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. स्टेज -१ मधील पौड, लोणावळा ग्रामीण, कामशेत व वडगाव पोलीस स्टेशन हद्दीत एकूण ५३.८ कि.मी अंतर असून सदर स्पर्धा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरीता वाहतुक वळविणे अत्यंत गरजेचे असलेने संबधीत स्टेज १ साठी खालील प्रमाणे वाहतुक वळविणेत येत आहे.

**त्याअर्थी मी, जितेंद्र डूडी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे मला मोटार वाहन कायदा-१९८८ चे कलम ११५ मधील तरतुदीनुसार व शासन गृह विभागाचे दि.१९/०५/१९९० चे अधिसूचनेनुसार मला प्राप्त अधिकाराने होणाऱ्या पुणे ग्रँड चॅलेंज टूर सायकल स्पर्धा २०२६ चे अनुषंगाने** स्टेज १ साठी खालील प्रमाणे वाहतुक वळविण्याचे आदेश देत आहे.

- पौड पोलीस स्टेशन:-
  १) घोटावडे गाव बापुजीबुवा मंदिर ते अंबडवेट कमान हा राज्य महामार्ग क्र.१३० वर असून या मार्गावर पर्यायी मार्ग उपलब्ध नाही तरी या मार्गावरील सायकलींग स्पर्धे दरम्यान संपुर्ण वाहतुक बंद करण्यात येत आहे.
  २) अंबडवेट कमान ते पौड करमोळी चौक असा एम.ड.आर प्रमुख जिल्हा रस्ता क्र११० या मार्गावर पर्यायी मार्ग उपलब्ध नाही तरी या मार्गावरील सायकलींग स्पर्धे दरम्यान संपुर्ण वाहतुक बंद करण्यात येत आहे.
  ३) पौड करमोळी चौक ते काशिंग जवण चौक एम.डी.आर प्रमुख जिल्हा रस्ता क्र २६ या मार्गावर पर्यायी मार्ग उपलब्ध नाही तरी सायकलींग स्पर्धे दरम्यान संपुर्ण वाहतुक बंद करण्यात येत आहे.
- लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन :-
  १) मौजे चावसर, जोवन नं २ जोवन नं ३ इत्यादी गावाकडुन येणारी वाहने मुंबई व पुणे बाजुकडे जाणेसाठी जोवन नं १ येथे न येता खालील पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे.
  **पर्यायी मार्गः**- मौजे जोवन नं २ व जोवन नं ३ चावसर इत्यादी गावातील वाहने हि मौजे तुंगी फाटा मार्गे लोणावळा अशी वळविण्यात येत आहे.
  २) मौजे आवेगाव, शिंदगाव इत्यादी गावाकडून येणारी वाहने हि कार्ले फाटा येथे येणेस बंदी करणे आवश्यक आहे.
  **पर्यायी मार्गः**- मौजे आंबेगाव, शिंदगाव इत्यादी गावातील वाहने हि मौजे दुधिवरे मार्गे औंढे औंढोली पुढे लोणावळा येथे वळविण्यात येत आहे.

- **कामशेत पोलीस स्टेशन:-** सदर वेळी सायकल स्पर्धक यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कडधेगाव हे हिंजवडी पुणे, पवनानगर, पौड कडे जाणारे मुख्य जक्शन असल्याने सदर सायकल स्पर्धेदिवशी कामशेत ते पवनानगर पौड अशी जाणारी वाहतुक सायकल स्पर्धा संपे पर्यंत पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.
  १) कामशेत कि.मी ४५/६०० ओव्हर ब्रीज पवना पवना चौक -कामशेत ते पवनानगर, पौड अशी पवनानगर मार्गाकडे जाणारे वाहतुक सायकल स्पर्धा दिवशी जुने पुणे-मुंबई हायवे (एन एच ४८) कामशेत कि.मी ४५/६०० ओव्हर ब्रीज पवना चौक या ठिकाणी पुर्णपणे बंद करावी. कारण पवनानगर, पौड, आर्डव, शिंवणे, महागांव, शिरगांवकडे जाणारा कामशेत कडून एकच मार्ग असून पर्यायी मार्ग नाही. त्यामुळे सदर दिवशी कामशेत ते पवनानग, पौडकडे जाणारी वाहतुक बंद ठेवण्यात येत आहे.
- **वडगाव मावळ पोलीस स्टेशन:-**
  १) शिरगाव परंदवडी कडून येणारी वाहतुक बेबडओहोळ मार्गे शिवणे शिवली बाजुकडे न पाठवता सदरची जुने मुंबई पुणे हायवेने वळविण्यात येत आहे.
  २) चांदखेड कडून डोणे बाजुकडे येणारी वाहतुक चांदखेड या ठिकाणी सायकल स्पर्धा संपेपर्यंत पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.
  ३) कामशेत मार्गे थुगांव कडे जाणारी वाहतुक पर्यायी मार्ग उपलब्ध नसलेने मौजे कामशेत येथे सायकल स्पर्धा संपेपर्यंत पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.
  ४) मळवंडी ढोरे, येळघोल शिवली गावाकडून आर्डव बाजुकडे येणारी वाहतुक भडवली गावचे अलिकडील चौकात येलघोल फाटा येथे सायकल स्पर्धा पुर्ण होईपर्यंत पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

  स्टेज १ करीत **"पुणे ग्रँड चॅलेंज टूर२०२६** अनुषंगाने कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करीता दि.२०/०१/२०२६ रोजी सकाळी ०८/०० वा ते सायंकाळी १८/०० वा वरील प्रमाणे सर्व प्रकारची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणेत व वाहतुक बंद करणेचा आदेश देणेत येत आहे.

**सदरची अधिसूचना आज दि. १६/०१/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.**

जिल्हादंडाधिकारी सत्यमेव जयते पुणे

(जितेंद्र डुडी)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हादंडाधिकारी, पुणे

**प्रति,**

**पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण,** चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे,

२/- प्रस्तुत आदेशानुसार वाहतुक वळविल्याचे फलक बसविण्याचे कार्यवाहीसाठी रवाना तसेच जे रस्ते पुर्णपणे बंद केले आहेत त्या ठिकाणी कायदा व सुव्यव्सथेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षत घ्यावी.

प्रत -
१. मा. अवर सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव, परिवहन, महाराष्ट्र राज्य , मंत्रालय, मुंबई
४. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मंत्रालय, मुंबई
६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.
७. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, स्वारगेट, पुणे.
८. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.